नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०२/०३/२०२५ (रविवार) दुपार

## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## २ वाहनांतुन ६ जनावरांची सुटका
## एकुण ९ लाख ६५ हजरांचा मुद्‌देमाल जप्त

**पोस्टे कुही :–** दिनांक ०१/०३/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा वग फाटा येथे नाकाबंदी केली असता वाहन क्रमांक एम. एच. ४० बी.जी. ९५६३ आणि वाहन क्रमांक एम एच ४९ ए.टी ७६०३ हे दोन वाहन संशयीत रित्या जाताना दिसल्याने सदर वाहनांची थांबवुन तपासणी केली असता, वाहन क्रमांक एम एच ४० बी.जी ९५६३ मध्ये तीन बैल आणि वाहन क्रं एम एच ४९ ए.टी ७६०३ मध्ये तीन बैल क्रुरतेने दोरीच्या साहयाने बांधुन,चारापाण्याची सोय न भरून नेताना मिळुन आले. वाहन क्रं एम. एच. ४० बी.जी. ९५६३ चा चालक नामे आदित्य रविंद्र सोनसरे,रा. सिल्ली,ता. कुही ,जि नागपुर याला विचारपुस केली असता त्याने सदर वाहनाचे मालक रविंद्र गंगाधर सोनसरे, रा सिल्ली ता कुही, जि नागपुर हे असल्याची माहीती दिली. वाहन क्रमांक एम एच ४९ ए.टी ७६०३ चा चालक नामे रोहीत गजानन भिवगडे,रा. सिल्ली ,ता. कुही ,जि नागपुर याला वाहन मालकाबाबत विचारापुस केली असता त्याने वाहन मालक संजय लांजेवार ,रा सिल्ली, ता कुही, जि. नागपुर आहे अशी माहीती दिली. तसेच दोन्ही चालकांनी सदर जनावरे ही रमजान शेख, मांढळ ,ता कुही. जि नागपुर याने वाहनात भरून दिल्या बाबत माहीती दिली. पोलीसांनी चालक आरोपीतांच्या ताब्यातुन पंचासमक्ष **१) वाहन क्रमांक एम. एच. ४० बी.जी ९५६३ आणि त्यातील ३ बैल एकुण किंमती ४,७५,०००/– रूपयाचा मुद्‌देमाल आणि २) वाहन क्रं एम. एच. ४९ ए.टी. ७६०३ आणि ३ बैल एकुण किंमती ४,९०,०००/– रूपयाचा मुददेमाल**

असा दोन्ही वाहनासह ,६ बैल  असा एकुण ९,६५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी  नामे १. आदित्य रविंद्र सोनसरे,रा. सिल्ली,ता. कुही ,जि नागपुर ,२. रविंद्र गंगाधर सोनसरे,रा. सिल्ली, ,ता. कुही ,जि नागपुर, ३. रोहीत गजानन भिवगडे, रा सिल्ली ता कुही जि नागपुर , ४. संजय लांजेवार , रा सिल्ली, ता. कुही जि नागपुर, ५. रमजान शेख, मांढळ,ता कुही जि. नागपुर यांचेविरूद्ध कलम ,११(१) , ११ (१) (डी), (ई), (एफ) प्राण्यांचा छाळ प्रतिबंधक अधिनियम १९६०,सहकलम ५(१) ,०९ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात अला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर